# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

**Maharashtra Housing & Area Development Authority**

**जनसंपर्क विभाग**

कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१.
दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७, ६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com


==========================================================================

जावक क्रमांक - ४१ दिनांक :- ०७ जानेवारी, २०२२

प्रसिद्धीपत्रक

# 'सर्वांसाठी घरे' हा कार्यक्रम महाराष्ट्र शासन प्राधान्याने राबविणार; म्हाडाचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध - उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते म्हाडा पुणे मंडळाच्या ४ हजार २२२ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत उत्साहात

मुंबई, दि. ०७ जानेवारी, २०२२ :- प्रत्येकाला हक्काचे घर मिळाले पाहिजे, हे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा ) पुणे मंडळातर्फे ४ हजार २२२ सदनिकांच्या विक्रीसाठी आज काढण्यात आलेली संगणकीय सोडत त्याच धोरणाच्या दिशेने पडलेले आश्वासक पाऊल आहे. 'सर्वांसाठी घरे' हा कार्यक्रम राज्य शासन प्राधान्याने राबविणार असून 'म्हाडा'चे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी दिली.

पुणे येथील जिल्हा परिषदेच्या नवीन सभागृहात म्हाडा पुणे मंडळातर्फे पुणे, सांगली, सोलापूर जिल्ह्यातल्या विविध गृहनिर्माण प्रकल्पाअंतर्गत उभारलेल्या ४ हजार २२२ सदनिकांच्या विक्रीसाठी ऑनलाईन संगणकीय सोडत महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अजित पवार यांच्या हस्ते आज काढण्यात आली. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार मुंबई येथील देवगिरी शासकीय निवासस्थानातील कार्यालयातून ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते. त्यावेळी श्री. पवार बोलत होते.

या कार्यक्रमाला गृहनिर्माण राज्यमंत्री श्री. सतेज पाटील, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव श्री. मिलिंद म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर व्हीसीद्वारे उपस्थित होते. तर कार्यक्रमस्थळी व्यासपीठावर पुणे जिल्हा परिषद अध्यक्ष सौ. निर्मला पानसरे, म्हाडा पुणे मंडळाचे मुख्याधिकारी अधिकारी श्री. नितीन माने आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार म्हणाले की, सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात सदनिका उपलब्ध करून देण्यासाठी म्हाडा ही संस्था आशेचा किरण असून कोविड काळातही ४ हजार २२२ सदनिकांसाठी ६५ हजार १८१ या विक्रमी संख्येने आलेले अर्ज हे त्याचेच प्रतीक आहे. नागरिकांचा म्हाडा या संस्थेच्या पारदर्शक व विश्वसनीय कामकाजावर पूर्ण विश्वास असून भविष्यात म्हाडाच्या माध्यमातून अधिकाधिक परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन श्री. पवार यांनी केले. श्री. पवार पुढे म्हणाले की, सामान्य माणसाला परवडणारे घर उपलब्ध करून देण्यासाठी व बांधकाम क्षेत्राला गती देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले

आहेत. या निर्णयाचे चांगले परिणाम आता दिसायला लागले आहेत. कोरोना संकटकाळात मुद्रांक शुल्कात कपात करण्याचा महत्वाचा निर्णय राज्य शासनाने घेतल्यामुळे बांधकाम क्षेत्राला उर्जितावस्था मिळाली असून सर्वसामान्य घर खरेदीदारांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. राज्यातल्या सर्वांना हक्काचं घर मिळावे यासाठी शहरी आणि ग्रामीण भागात विविध गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. 'सर्वांसाठी घरं' कार्यक्रमांतर्गत सर्वांना हक्काचं घरं देण्याचा प्रयत्न आहे, असे श्री. पवार यांनी सांगितले. कोरोनामुक्तीसाठी लसीकरण हेच मोठे सुरक्षा कवच आहे. त्यामुळं सर्वांनी लसीकरण करुन घ्यावं, असे आवाहनही श्री. पवार यांनी केले. या सोडतीच्या निमित्ताने ज्यांना हक्काची घरे मिळणार आहेत, त्यांचे उपमुख्यमंत्री महोदयांनी अभिनंदन केले. इतरांनी निराश न होता, म्हाडाच्या पुढच्या सोडतीत भाग घेण्याचे आवाहन श्री. पवार यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक म्हाडा पुणे मंडळाचे मुख्याधिकारी नितीन माने यांनी केले.

सदर सोडतीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना(नागरी) अंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटासाठी सांगली येथे १५ सदनिकांचा समावेश होता. म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत २२१ सदनिका, २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत पुणे महानगरपालिका हद्दीत ७१९ तर पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत ५८९ सदनिकांचा सोडतीत समावेश होता. म्हाडा गृहनिर्माणयोजना प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत २ हजार ६७८ सदनिका सोडतीत विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या. या सोडतीत पुण्यासह सांगली, सोलापूर जिल्ह्यातील सदनिकांचा समावेश करण्यात आला. म्हाडातर्फे अर्जदारांना घरबसल्या सोडतीचा निकाल पाहता यावा यासाठी https://mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरून सोडतीचे थेट प्रक्षेपण वेबकास्टिंग तंत्रज्ञानाद्वारे करण्यात आले.

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने आखून दिलेल्या नियमावलीचे पालन सोडतीच्या कार्यक्रमात करण्यात आले.

सही /-
मुख्य जनसंपर्क अधिकारी/म्हाडा




DY CM MAHARASHTRA
Mukul Bhagat
DCM office 2
Satej D. Patil, MoS Housing



